# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४

परिपत्रक क्र.कोविमं/लेखा/शिक्षण संक्रमण/२२०४ /२०१९/ दिनांक ३१/१०/२०१९

विषय: मंडळ प्रकाशन शिक्षण संक्रमण मासिकासाठी **स्वतंत्र वेबसाईट** व **अँड्रॉईड ॲप** सुरू केल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक,माध्यमिक शाळा व सर्व प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालये यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दरमहा शिक्षण संक्रमण अंक प्रकाशित करण्यात येते. या मासिकातून पुनर्रचित अभ्यासक्रम, अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दती, विषयनिहाय पाठ्यपुस्तकातील आशय, नावीन्यपूर्ण शालेय उपक्रम, शैक्षणिक घडामोडी याबाबतच्या माहितीसोबतच अभ्यासू शिक्षक, पालक, विद्यार्थी इत्यादींशी संबंधित उत्तम, वैचारिक साहित्यही प्रसिध्द केले जाते. सदर शिक्षण संक्रमण अंकाची वार्षिक वर्गणी रू.२००/- आहे. सदर अंकासाठी यापूर्वी वर्गणी भरण्यासाठी पोस्टात जाऊन मनी ऑर्डर करणे, डी.डी. काढून पाठविणे किंवा मंडळ कार्यालयात रोखीने वर्गणी भरावी लागत असे परंतु आता सदर अंकाची वर्गणी ही ऑनलाईन भरता येईल. शिक्षण संक्रमण अंक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी तसेच लेखकांना मासिकासाठी साहित्य/लेख पाठविणे सोईचे व्हावे यांकरिता शिक्षण संक्रमण मासिकासाठी स्वतंत्र वेबसाईट व अँड्रॉईड ॲप सुरू करण्यात आले आहे. सदर शिक्षण संक्रमण अंकासाठी **http://shikshansankraman.msbshse.ac.in** या संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच **Google Play Store वर shikshansankraman** असे टाईप करून अँड्रॉईड ॲप डाऊनलोड करता येते व https://playgoogle.com/store/apps/details?id=com.stateboard.shikshansankraman वर सर्च करूनही ॲप डाऊनलोड करता येते. सबब शिक्षणसंक्रमण वर्गणीदार यांना मंडळाचे बचत खातेक्रमांक ५०१००२०५४१९९४२ मध्ये ए.टी.एम/क्रेडीट कार्ड/ डेबिट कार्ड/ एन.ई.एफ.टी./ आर.टी.जी.एस. इत्यादीद्वारे शिक्षणसंक्रमण मासिक शुल्क रू.२००/- भरता येणार आहे. तरी या आधुनिक सुविधेचा सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक, विद्यार्थी, पालक वर्गणीदार यांनी लाभ घ्यावा.

31/10

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर